# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.05.2025** **वारःरविवार**

1. युद्धविरामावरील सामंजस्याचं पाकिस्तानकडून उल्लंघन, कोणतीही दहशतवादी कृती, युद्ध समजण्यात येईल-भारताचा इशारा
2. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाचा सामंजस्य करार
3. ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं मुंबईत दीर्घ आजारानं निधन
4. खेलो इंडिया क्रीडास्पर्धेत महाराष्ट्राची यशाची चढती कमान कायम आणि
5. नैर्ऋत्य मोसमी पाऊस 27 मेपर्यंत केरळमध्ये दाखल होण्याचा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज

**युद्धविराम**

युद्धविरामाबाबत काल पाकिस्तानसोबत झालेल्या सामंजस्य कराराचं वारंवार उल्लंघन होत असल्याचं परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी सांगितलं. नवी दिल्लीत पत्रकारांना माहिती देताना मिसरी म्हणाले की, भारतानं याची गंभीर दखल घेतली असून सशस्त्र दलं त्यावर पुरेसा आणि योग्य प्रतिसाद देत आहेत.

सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून सातत्यानं गोळीबार केला जात आहे. आंतरराष्ट्रीय सीमा तसंच नियंत्रण रेषेवर उल्लंघनाची पुनरावृत्ती झाल्यास त्यांना कठोरपणं सामोरं जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असं ते म्हणाले.....

**पिछले कुछ घंटों से इस समझौते का पाकिस्तान की ओर से घोर उल्लंघन हो रहा है। भारतीय सेना जवाबी कार्रवाई कर रही है और इस सीमा अतिक्रमण से निपट रही है। ये अतिक्रमण अत्यंत ही निंदनीय है और पाकिस्तान इनके लिए जिम्मेदार है। हमारा मानना है कि पाकिस्तान इस स्थिति को ठीक से समझे और इस अतिक्रमण को रोकने के लिए तुरंत उचित कार्रवाई करे।**

**शस्त्रसंधी**

तत्पूर्वी काल दुपारी पाकिस्तानच्या लष्करी कार्यवाही महासंचालकांनी उभय देशांदरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला आणि गोळीबार तसंच लष्करी कारवाया तातडीनं थांबवण्यावर दोन्ही देशांदरम्यान सहमती झाली असं विक्रम मिस्री यांनी तातडीनं घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. त्यानुसार काल संध्याकाळी पाच वाजल्यापासून युद्धविराम करण्याचं ठरलं आहे.

**मिसरी**

पाकिस्तानच्या कुरापतींवर याआधी भारतानं केलेल्या कारवाईची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. पाकिस्तान सातत्यानं करत असलेली

घुसखोरी आणि ड्रोन हल्ल्यांना भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं. भारतीय वायु दलाच्या विमानांनी हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या शस्त्रांचा वापर करत पाकिस्तानची लष्करी केंद्रं, नियंत्रण केंद्रं, रडार आणि शस्त्रसाठ्यांवर हल्ले करत ती उद्धवस्त केल्याची माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली. पाकिस्तान सातत्यानं चुकीच्या बातम्या पसरवत असल्याचंही मिसरी यांनी नमूद केलं.

**बैठक**

तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं आपल्या निवासस्थानी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांची बैठक घेतली. भविष्यात पाकिस्तानकडून होणाऱ्या कोणत्याही दहशतवादी कृत्याला देशाविरुद्ध युद्धाची कृती मानून त्याला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली.

**खोटा प्रचार**

पाकिस्तानच्या कुरापती भारतानं रोखल्यामुळे पाकिस्तान डिजिटल माध्यमांवर अफवा आणि चुकीची माहिती पसरवत आहे. अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास तत्काळ पत्र सूचना कार्यालयाला याची माहिती द्यावी, 87 99 71 12 59 या व्हॉट्सअप क्रमाकांवर किंवा socialmedia@pib.gov.in या मेलवर असा मजकूर पाठवावा, असं आवाहन सरकारनं केलं आहे.

**आळंदी**

'प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी इथं साडेचारशे एकर जागेत संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल', अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. आळंदी इथं संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. इंद्रायणी नदीचा विकास आराखडा केंद्र सरकारकडून लवकरच मंजूर करून घेण्यात येईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले.....

**आपण एक इंद्रायणीचा विकास आराखडा तयार केला होता. या आराखड्याच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसहित एकोणचाळीस छोटीमोठी गावं आणि शहरं आहेत, की ज्याचं संपूर्ण घाण पाणी सांडपाणी इंद्रायणीमध्ये चाललेलं आहे. हे सगळं पाणी त्या ठिकाणी शुद्ध करणे आणि केवळ आणि केवळ शुद्ध पाणीच इंद्रायणीत जाईल अशा प्रकारचा आराखडा तयार केलेला आहे. या आमच्या इंद्रायणी नदीला कमीत कमी कालावधी या ठिकाणी घेऊन निर्मल करू हा शब्द आज या निमित्ताने मी आपल्याला निश्चितपणे देतो.**

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाङ्मयाचा साक्षेपी चिंतनात्मक आढावा घेणाऱ्या 'नमो ज्ञानेश्वरा' या ग्रंथाचं तसंच त्याच्या ऑडियो बुकचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. तत्पूर्वी फडणवीस यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज समाधीचं दर्शन घेऊन विधिवत पूजा केली.

**तापी खोरे**

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाचा सामंजस्य करार काल करण्यात आला. काल भोपाळ इथं झालेल्या आंतरराज्य नियंत्रण मंडळाच्या 28 व्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला 19 पूर्णांक 36 शतांश टीएमसी पाणी मिळणार असून मध्यप्रदेशला 11 पूर्णांक 76 शतांश टीएमसी पाणी मिळणार आहे. तापी नदीच्या तीन प्रमुख प्रवाहातून कालवे काढून संबंधित क्षेत्राच्या कानाकोपऱ्यात पाणी पोहोचेल. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांना लाभ मिळणार असून विशेषतः नागपूर शहराची तहान भागणार आहे.

ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना असल्याचं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितलं. महाराष्ट्रातली 2 लाख 34 हजार 706 हेक्टर जमीन तर मध्यप्रदेशातली 1 लाख 23 हजार 82 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पात कोणत्याही गावाचं विस्थापन होणार नाही, असं यादव यांनी सांगितलं. ही योजना केंद्र सरकारच्या जलसिंचन योजनांमध्ये समाविष्ट करावी, अशी विनंती आपण केंद्र सरकारला करणार असल्याचं ते म्हणाले.

**सुंदर शाळा**

महाराष्ट्र शासनानं शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानातील शासकीय गटात जिल्हास्तरावर मोर्शी तालुक्यातील दापोरी जिल्हा परिषद केंद्र शाळेनं जिल्ह्यात तृतीय क्रमांकाचं 3 लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविल्याची माहिती मुख्याध्यापक गजानन चौधरी यांनी दिली.

**खरीप बैठक-सातारा**

भारतीय हवामान विभागानं यंदा 103 टक्के पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आहे. यामुळे खरीपातील पेरणीचे क्षेत्र वाढणार आहे. या हंगामात बोगस बियाणे आणि खतांचा पुरवठा होणार नाही याची दक्षता घ्यावी, त्यासाठी तपासणीकरता भरारी पथकांची स्थापना करावी, असे निर्देश सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी काल दिले. सातारा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक-2025 पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये ते बोलत होते.

**गायकवाड निधन**

ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं काल मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते 61 वर्षांचे होते. पानिपत, बेल बॉटम, उरी, दंगल, पी के  यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसाठी तसंच पावनखिंड, फत्ते शिकस्त, शेर शिवराज यासारख्या ऐतिहासिक चित्रपटांसाठी त्यांनी रंगभूषाकार म्हणून काम केलं. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखेच्या गरजेनुसार कलाकारांच्या चेहऱ्यात आणि रुपरेषेत बदल करण्याची जादू त्यांच्या ब्रशमध्येहोती. काल मुंबईत दादर इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**दांडेकर निधन-सांगली**

सांगलीतील व्यापारी उद्योग क्षेत्रातील उपक्रमशील व्यक्तिमत्व, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे माजी उपाध्यक्ष अरुण रंगनाथ तथा दादा दांडेकर यांचं काल निधन झालं. ते 75 वर्षांचे होते. किरकोळ किराणा व्यापारी संघटना, विश्वजागृती मंडळ, ब्राह्मण नागरी सहकारी पतसंस्था, ऍक्टिव्ह ग्रुप यासारख्या विविध संस्था त्यांच्या पुढाकाराने सुरू झाल्या. सांगली भूषण पुरस्कार, सूर पहाटेचे, आंतरजातीय तसंच अपंग वधु वर मेळावे, महाहादगा अशा सांगलीत सुरु असलेल्या विविध नाविन्यपूर्ण संकल्पनांचे ते जनक होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र 73 पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात 27 सुवर्ण, 22 रजत आणि 24 कास्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटक दुसऱ्या तर राजस्थान तिसऱ्या स्थानावर आहेत.

**तिरंदाजी**

शांघायमध्ये सुरु असलेल्या विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारतानं काल तीन पदकं जिंकली. भारतानं मिश्र सांघिक स्पर्धेतही कांस्यपदक जिंकलं.

**मोसमी पाऊस**

नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन येत्या 27 मे रोजी केरळमध्ये होईल, असा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज आहे. यात 4-5 दिवसांचा फरक पडू शकतो. 13 मे च्या आसपास नैर्ऋत्य मोसमी पाऊस बंगालच्या उपसागरात आणि अंदमान बेटांवर दाखल होण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाचे प्रवक्ते उमाशंकर दास यांनी सांगितलं. दरवर्षी मोसमी पाऊस साधारणपणे 1 जून रोजी केरळात दाखल होतो.

**हवामान**

उदय सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असल्याचं हवामानशास्त्र विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.